लोकमत महाराष्ट्र शनिवार, दि. २४ डिसेंबर २०२२

संजय सावंत; दोडामार्ग महाविद्यालयात दोन दिवस चर्चासत्रात मार्गदर्शन

# शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा

लोकमत न्यूज नेटवर्क

दोडामार्ग : हवामानात होणाऱ्या बदलामुळे शेतीवर विपरीत परिणाम होत आहे. उत्पादनावर त्याचा फटका बसत असल्याने शेतकऱ्यांत नाराजी दिसते. या हवामान बदलाच्या संकटाला सामोरे जाण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपले उत्पादन वाढविणे लक्ष केंद्रित केले पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत यांनी केले.



दोडामार्ग येथील हळबे महाविद्यालयात कुलगुरू डॉ. संजय सावंत यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी विवेकानंद नाईक, प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, डॉ. संजय भावे उपस्थित होते.

दोडामार्ग हळबे महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाच्या वतीने आयसीएसएसआर मुंबई पुरस्कृत 'हवामान बदल आणि भारतीय शेती' या विषयावर आंतरविद्या दोन दिवसीय चर्चासत्र झाले. यावेळी ते शेतकऱ्यांना मार्गदर्शनपर बोलत होते. यावेळी डॉ. बाळासाहेब कोकण कृषी विद्यापीठाचे संशोधक संचालक डॉ. संजय भावे, नवनिर्माण शिक्षण संस्था रत्नागिरीचे संचालक सूर्यकांत परमेकर, आत्मा समितीचे तालुकाध्यक्ष प्रेमानंद देसाई, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य विवेकानंद नाईक, प्रा. राजेंद्र केरकर, प्राचार्य डॉक्टर सुभाष सावंत, प्रा. डॉ. एस. यु. दरेकर उपस्थित होते.

डॉ. संजय सावंत म्हणाले, शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी विद्यापीठ व देशपातळीवर संशोधन आहे. सर्व शेतकऱ्यांनी त्याचा लाभ घेणे गरजेचे आहे. कोकण प्रदेश हा सद्यस्थितीत हवामान बदलापासून काही प्रमाणात सुरक्षित असला तरी भविष्यात ही समस्या वाढण्याचा धोका नाकारता येणार नाही. त्यासाठी शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन वाढविणे गरजेचे आहे, असे उद्‌गार त्यांनी काढले.

समारंभासाठी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोलीचे संशोधक सहायक डॉ. कस्तुरे, वेगवेगळ्या महाविद्यालयाचे प्रतिनिधी, तालुका कृषी अधिकारी प्रमोद बनकर, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## शेतीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलणे गरजेचे

बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. संजय भावे यांनी सांगितले की, आपला शेतीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलणे गरजेचे आहे. शेतीला जर आपण इतर उद्योगाची जोड दिली व पूर्णवेळ शेती केल्यास त्याचा फायदा निश्चितच शेतकऱ्यांना होईल.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक तथा महाविद्यालय विकास समितीचे सदस्य विवेकानंद नाईक यांनी महाविद्यालयात होणाऱ्या सांस्कृतिक विविध उपक्रमासाठी स्टेज तयार करून दिल्याबद्दल त्यांचा कुलगुरूंच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एस. यु. दरेकर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. संजय खडपकर, तर आभार डॉ. सोपान जाधव यांनी मानले.